रविवार दि.९ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# बीडच्या खोक्याची उर्फ सतिश भोसलेची सिंदखेड राजा तालुक्यातील पीडित व्यक्तीला जबर मारहाण

## गुप्त अंगात पेट्रोल टाकणाऱ्या आरोपींना फाशी द्या पीडित व्यक्ती ची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

बीड जिल्ह्यातील भाजपचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेला कुख्यात गुंड 'खोक्या' उर्फ सतिश भोसले याने एका पीडित व्यक्तीला बॅटने अमानुष मारहाण करत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. हा पीडित व्यक्ती सिंदखेड राजा तालुक्यातील माहेरखेड येथील रहिवासी असून, ते जेसीबी व पोकलँडचे चालक आहेत. 'खोक्या' व त्याच्या गुंडांनी अवघड जागेत पेट्रोल ओतले, अनन्वीत अत्याचार केले, तसेच बॅटने तळपायावर मारहाण केली. या सर्व गुंडांना फाशीचीच शिक्षा द्यावी, अशी मागणी कैलास वाघ यांनी केली आहे.



बीड येथील अमानवीय मारहाण व अत्याचार प्रकरण संपूर्ण राज्यात गाजत आहे. भाजपचे आमदार सुरेश धस यांचा कट्टर समर्थक व निकटवर्तीय कुख्यात गुंड 'खोक्या' उर्फ सतीश भोसले याने दीड वर्षांपूर्वी एका व्यक्तीला बॅटने जबर मारहाण करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्या घटनेतील मार खात असलेले कैलास वाघ हे सिंदखेडराजा तालुक्यातील माहेरखेड या गावातील रहिवासी आहेत. 'त्यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी झालेल्या अत्याचाराचा पाढाच वाचला. त्यांच्या आईनेदेखील बीडच्या गुंडांनी पिस्तुल दाखवून पोराला पळवून नेले होते, असे सांगितले.

पीडित कैलास वाघ हे बीड जिल्ह्यातील एका गावात पोकल्यांडवर ऑपरेटर म्हणून काम करीत होते. त्या कामाचे पैसे दिले नाही म्हणून कैलास वाघ हे घरी माहेरखेडला निघून आले होते. तेव्हा बीड जिल्ह्यातील काही सात ते आठ गुंड कैलासच्या घरी येऊन त्यांना बीड जिल्ह्यात घेऊन गेले व तिथे बेदम मारहाण केली. अतोनात दहा दिवस अत्याचार केले, हालहाल केले. त्यानंतर कैलास वाघ हे तेथून कसेबसे पळून आले व आपला जीव वाचविला होता. तेव्हाच सिंदखेड राजा पोलिसात कैलास वाघ यांनी तक्रार दाखल केली होती, मात्र पोलिसांनी या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे सिंदखेड राजा पोलिसदेखील संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. आता आमदार सुरेश धस यांना भेटायचे आहे व त्यांना हा सर्व प्रकार सांगायचा असल्याचे कैलास वाघ हे सांगत आहेत. तसेच जर आरोपींना शिक्षा झाली नाही तर आत्महत्या केल्याशिवाय पर्याय नसल्याचा इशारादेखील कैलास वाघ यांनी दिला आहे.

### तक्रार दाखल करूनही सिंदखेड राजा पोलिसांचे गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष

सिंदखेड राजा पोलीस स्टेशन ला तक्रार दाखल करूनही संबंधित पोलिस स्टेशन च्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे पुढे येत आहे. त्यामुळे सिंदखेड राजा पोलीस आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. बीड वरून येऊन पिस्तूल चा धाक दाखवत पीडित व्यक्तीला दोन वेळा सिंदखेड राजा तालुक्यातून २ वेळा उचलून नेल्या जाते तरी सिंदखेड राजा पोलीस मात्र झोपेचे सोंग घेत असेल तर या प्रकाराला काय म्हणावे? पीडित व्यक्तीच्या आईने माध्यमांशी बोलताना सांगितले आहे की घरी येऊन पिस्तूल दाखवून महिलेच्या मुलाला बीडच्या गुंडांनी उचलून नेले. त्यानंतर तक्रार देऊनही पोलिसांनी दाखल घेतली नाही. आता या गुम्हासह पोलीस अधीक्षकांनी सिंदखेड राजा पोलिसांची चौकशी करून मागील २ वर्षात किती पीडित व्यक्तींना सिंदखेड राजा पोलिसांनी अन्याय सहन करायला लावलाय, आणि यंत्रणा मात्र मूग गिळून गप्प बसली आहे याची चौकशी व्हायला हवी..

## जि.प.कन्या प्राथमिक शाळा उमरी व कें.प्रा.शा.उमरी येथे

# जागतिक महिला दिना निमित्त माता पालकांच्या मेळाव्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जि.प. कन्या शाळा व कें.प्रा.शा.उमरी येथे माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कन्या शाळा उमरीच्या शा.व्य.स.च्या उपाध्यक्षा सौ. वर्षा पडोळे तर प्रमुख पाहूणे म्हणून बितनाळ केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.संतोष चाटोरीकर, केंद्रिय मुख्याध्यापक श्री.माधवराव पुटवाड,विषय शिक्षिका सौ.मनिषा पगारे माजी अध्यक्षा सौ.वर्षा जाधव होत्या, सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमेंचे पूजन करण्यात आले, त्यानंतर सौ.सिंगरवाड ,श्रीमती इंदिरा जाधव,सौ.शोभा पेड,सौ.पाटील, सौ.ज्योती भोसले,सौ.ज्योती खडके सौ.श्रीमंगले यांनी उपस्थित सर्व माता पालकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आला,आई म्हणून,आपल्या मुलांच्या उज्वल शै.भविष्यासाठी कशा आपण कशा जागरूक असायला पाहिजे? याबाबत सौ. पगारे मॅडम यांनी आपले विचार मांडले.तर आपले मुल हे आपल्या जन्माचे पिक आहे,सुसंस्काराने त्यांची जोपासना,आपण जागरूक पणे केलीच पाहिजे. व दि. ५ मार्च २५ च्या शासन निर्णयानुसार निपूण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत आपण सर्वांनी मिळून दि.५ मार्च २५ ते ३० जून २५ या



कालावधीत एकमेकांच्या संपर्कात राहून १०० % विद्यार्थ्याचे ऋङछ पूर्ण करण्याची जबाबदारी आपण यशस्वीपणे कशी पार पाडू शकतो ? या बाबत केंद्र प्रमुख श्री.संतोष चाटोरीकर यांनी पालक मातांशी व शिक्षकांशी संवाद साधला.या वर्षी उन्हाळी सुट्ट्यांमध्ये सर्व मातांनी या कार्यक्रमात आम्हाला सहकार्य करतीलच अशी अपेक्षा मु.अ.श्री.पूटवाड सर यांनी व्यक्त केली असता,आम्ही आमच्या घरी आमच्या विद्यार्थ्यांचा आभ्यास शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नक्कीच पूर्ण करु.असे अश्वासन उपस्थित मातांनी दिले. शेवटी सन २४-२५ वर्षातील दुसऱ्या टप्प्यातील गणवेश विदयार्थ्यांना वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ.वत्सला पाटील तर आभार प्रदर्शन जि.प. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.संगीता सिंगरवाड यांनी केले.

# दिपभारती विद्यालयात जागतिक महिला दिन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन अंतर्गत चालणाऱ्या दिपभारती माध्य व उच्च माध्य विद्यालय दानापूर या शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मु.अ. श्री वाय. एस. गवळी यांच्या हस्ते माता जिजाऊ , क्रोतिज्योति सावित्रीबाई फुले व माता रमाई यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले . शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री वाय.एच. कापरे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले . याप्रसंगी शाळेचे मु. अ.श्री गवळी सर यांनी विद्यार्थिनींना बुके देऊन त्यांचा सन्मान केला .कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले .

# कंधार आगार येथे जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्तीचा सन्मान!



**पूर्वी महिलांना अनेक बंधनं होती, पण त्यांनी आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात स्वत:चे अस्तित्व सिद्ध केले. सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, किरण बेदी यांसारख्या महिलांमुळे आपल्याला प्रेरणा मिळते. पण केवळ काही महिलांचा सन्मान करून आपली जबाबदारी पूर्ण होत नाही. प्रत्येक स्त्रीला समान हक्क, संधी आणि आदर मिळायला हवा – कंधार आगार व्यवस्थापक अभय वाढवे**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

दरवर्षी ८ मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महिलांच्या समान हक्कांना आणि समानतेला प्रोत्साहन देतो. त्यांच्या कामगिरीवर प्रकाश टाकतो. हा दिवस महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी, त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी जगभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी ठिकठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित केला जातो,

कंधार आगारात जागतिक महिला दिना निमित्त आगारातील महिला कर्मचारी यांनी आगारास २२ झाडे आणि कुंड्या भेट दिल्यात त्या अनुषंगाने आगार व्यवस्थापक कंधार यांनी सर्व महिला कर्मचारी यांना पुष्पुच्छ आणि पेन भेट दिली,फराळाची सोय करण्यात आले व सर्व महिला कर्मचारी यांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास आगाराचे आगार व्यवस्थापक अभय वाढवे सहायक वाहतूक अधिक्षक अनील पळणाटे प्रभारक ईश्वर गोरे वाहतूक निरीक्षक जगदिश मटगें,प्रमुख कारागीर जी.डी. गोणारे ,वरिष्ठ लिपिक चंद्रकात श्रीमगले, ज्ञानेश्वर कोडांमगले,गोविंद शिंदे,ज्ञानेश्वर केंद्रे,अशिष जोगे, संभाजी धाबेवार,भगवान चव्हाण,वाहतूक नियंत्रक काळे,तसेच सदर कार्यक्रमास महिला कर्मचारी सुनिता चेबळे,शषिकला राठोड,सारीका एंगलवाड,गिता अंबेकर,के.एस. तेलंगे,सारीका मारवाडे, बानू बेगम,सारीका धोंडगे,वर्षा किरातवाड,जयश्री मुंडे,उषा चिंचोले,पि.एस.स्वामी,एस.एस.स्वामी,एस.एच.डिकेकर,सावली वाघमारे,दिपीका धोट ,सगीता उचले,छाया गिते,रेणुका शेंडगे, या महिला कर्मचारी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू विद्यालय पारध मध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पारध । रमेश जाधव**

पारध येथील भिलदरी बहुउद्देशीय संस्थेच्या राजर्षी शाहू विद्यालयात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला.व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमचे पूजन करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ आईसाहेब, सावित्रीबाई फुले अशा विविध वेशभूषेत आल्या होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून पारध पोलीस ठाण्याच्या कविता बारवाल मॅडम या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास लोखंडे हे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर. डोईफोडे , महर्षी पाराशर ऋषी प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या साधना टेकाळे, अधीक्षक किशोर वाघ, उपप्राचार्य अमोल, बांडगे ,प्रा. अनिल मगर,उपमुख्याध्यापक विवेक अवसरमोल यांची उपस्थिती होती.



यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.मानसी भारती व आभार प्रदर्शन निलेश लोखंडे यांनी केले.याप्रसंगी अनिल लक्कस,विवेक प-हाड,स्वप्नील वाघ,मंगला काकफळे,मनिषा सांगळे,निकिता देशमुख,रूपाली बोराडे, काशीबाई सपकाळ,ज्योती लोखंडे, आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सूतगिरणी लहुरी ता.केज संबंधित बोगस कागदपत्रांचा पर्दाफाश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**


लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सूतगिरणी लहुरी ता. केज ही बोगस व बनावट कागदपत्रांच्या आधारे स्थापन करण्यात आली असून, यामुळे शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या ३४६ विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे परस्पर जात पडताळणी विभागामार्फत हस्तगत करण्यात आली आहेत. यामुळे शासनाकडून मिळवलेले ४१ कोटी रुपये त्यामध्ये वस्त्रोद्योग विभागाकडून २७ आणि समाज कल्याण विभागाकडून १४ कोटी रुपयांच्या रकमेची शासनाची फसवणूक झाली आहे. तसेच या सूतगिरणीने ग्रामपंचायतीचा बांधकाम परवाना घेतलेला नाही. फसवणूक संदर्भात ज्या व्यक्तींचे नाव समोर येत आहे, त्यात माजी आमदार संगीता ठोंबरे आणि चेअरमन विजय प्रकाश ठोंबरे यांचा समावेश आहे. केज पोलीस उपविभागीय अधिकारी कमलेश मीना यांच्या वर्तमनातील कार्यवाहीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, कारण दीड वर्षांपासून याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. यासंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, गृहसचिव आणि पोलीस महानिरीक्षकांनी आदेश दिले होते. तथापि, केज पोलीस स्टेशनच्या अधिकारी आणि कर्मचारी त्याच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ करीत आहेत. या सर्व घटनाक्रमाबाबत, तक्रार करण्याच्या प्रक्रियेत असलेल्या तक्रारदारांना पोलिसांकडून दबाव तंत्राचा वापर करण्याचीही बाब समोर आली आहे. प्रमुख निवेदनः पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या बीड जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे या प्रकरणाची आठ दिवसांत उच्चस्तरीय चौकशी व गुन्हा नोंद न झाल्यास, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि केज पोलीस स्टेशनच्या विरोधात मुंबई आझाद मैदानावर दि. २१ मार्च २०२५ रोजी पासुन आमरण उपोषण करण्यात येणार आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे सुतूगिरणीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, ही आमची मागणी आहे.अनिल तुरुकमारे बीड जिल्हाध्यक्ष पीपल्स रिपब्लिकन पार्टी यांनी मागणी केली आहे,



# तुकायन: वर्तमान जागवणारा दुर्मिळ ग्रंथ!

लोकनेता न्यूज नेटवर्क

सृजन-सज्जन महाराष्ट्राची नस-नाडी घट्ट पकडून ठेवलेला लोकसंत, लोककवी म्हणजे संत तुकाराम! सतराव्या शतकात तुकोबांच्या अभंग शब्दांनी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला. भक्ती आणि कृतीसह एकात्मता-स्वातंत्र्य-समता-बंधुतेच्या शिकवणीची सुमधुर वीणा खांद्यावर घेऊन निघालेले सामान्य शेतकरी पुत्र संत तुकाराम आणि त्यांचा अभंग वर्तमानात जगण्या-वागण्याचे भान देत महाराष्ट्राच्या श्वासात अखंड प्रवाही आहे! तुकाराम म्हणजे शांती आणि क्रांती! तुकाराम म्हणजे श्रृंगार आणि अंगार! तुकाराम म्हणजे उक्ती-कृती-भक्तीचा त्रिवेणी संगम! कबीरांच्या शब्दांचा नूतनाविष्कार म्हणजे तुकाराम! मेणाहून मऊ आणि वज्राहूनही कठीण महामानव म्हणजे तुकाराम! शिवबा-ज्योतिबा पासून ते नोबेल रविंद्रनाथ, संबोधि डॉ.बाबासाहेब, मिसाईल मॅन कलामांपर्यंत सर्वांनाच आकर्षित करणारा साक्षेपी संशोधक तुकाराम! संत तुकारामांच्या अभंग-जीवनावर संशोधन होऊन त्यांच्या अभंगांचे विविधांगाने चिंतन मांडणारे अनेक शोध प्रबंध आणि ग्रंथ लोकप्रिय झाले. तुकोबांच्या अभंगावर कीर्तन-प्रवचने करून अनेक सुप्रसिद्ध, लाखोपती झाले. तुकारामांचे विविध भाषात भाषांतर होऊन केंव्हाच तुकोबा सातासमुद्रापार पोहोचलेत! असे असले तरी समाजमनावरील तुकोबांचे अभंग गारुड संपायला तयार नाही आणि संपणारही नाही. यातच आज आज एमबीबीएस एमडी (मानसोपचार तज्ञ) अशी वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च पदवी संपादन करणारे डॉ.जगदीश नाईक यांनी आपल्या जीवनात प्रत्यक्ष अनुभूती घेऊन माणसाच्या दैनंदिन जगण्याला योग्य दिशा अर्थाने तुकोबांचा अभंग कसा मार्गदर्शक आहे(?) या अनुषंगाने।।तुकायन।।तुका म्हणे: तुकोबांची आरइबीटी (रॅशनल, इमोटीव, बिहेविअर थेरपी)हा मनोकायिक विश्लेषण करणारा दुर्मिळ ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ मानसोपचार तज्ञ तथा सुप्रसिद्ध मराठी कलावंत पद्मश्री डॉ.मोहन आगाशे (मुंबई), सुप्रसिद्ध कवी प्रा.इंद्रजीत भालेराव आणि जेष्ठ नेत्रतज्ञ-कीर्तनकार डॉ.विकास बाहेकर (बुलढाणा) आदि नामवंत सृजनांच्या सुभहस्ते प्रकाशित होत आहे. अलीकडे उच्च शिक्षित माणसं मोबाईल-मिडीयात गुंतलेली असतांना एखाद्या उच्च विद्याविभूषित एमडी मानसोपचार तज्ञ डॉक्टरांनी तुकोबांच्या अभंगांवर चिंतनशील पुस्तक लिहिणे ही क्रांतीच म्हणावी लागेल. आज उच्च शिक्षित माणसांनी वर्तमान परिपेक्षात समाजमन आणि तरुणांना योग्य दिशा देणारे अनुभूतीपूर्ण लेखन करणे काळाची नितांत गरज बनली असतांना तुकोबांच्या लोकप्रिय अभंगांच्या आधारे।।तुकायन।।अर्थात तुकोबांच्या अभंगांचे तर्कशुद्ध, भावनिक वर्तनाधारे मानवी मनावर उपचार अनुषंगाने विश्लेषण इथे वाचायला मिळाले आहे. ज्ञानसाधना प्रकाशन रायगड यांनी प्रकाशित।।तुकायन।।लाश्री वेदप्रकाश आर्य आणि श्री विकास नरवाडे यांचे सुंदर मुखपृष्ठ आहे. विशेष म्हणजे डॉ.जगदीश नाईक यांचे गुरु पद्मश्री डॉ.मोहन आगाशे यांची आशीर्वादपर प्रस्तावना लाभली असून बुलढाणा येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.विकास बाहेकरांच्या 'अभंगांची मनोवैज्ञानिकता' या निबंधाने हा ग्रंथ समृद्ध झाला आहे.एखादा ग्रंथ कुणाविषयी आणि त्याचा लेखक कोण आहे(?) याला विशेष महत्व असते.।।तुकायन।।ग्रंथासाठी या दोन्ही बाबी अत्यंत मोलाच्या आहेत. पुस्तकाचे लेखक हे उच्च विद्याविभूषित मनोवैज्ञानिक चिकित्सक असून मनाचे सखोल चिंतन आपल्या अभंगद्वारा लिहिणारे वारकरी संप्रदायाचे कळस जगद्गुरू संत तुकोबाराय आहेत. यामुळे हा ग्रंथ मोठा मौलिक आहे. तुकोबांचा प्रयत्नवाद, तुकोबांचे भावविश्व, तुकोबांचे सामाजिक प्रश्न व उपाय, आणि विद्रोही तुकोबाराय या चार भागात विभागलेला हा ग्रंथ त्या त्या विभागाला न्याय देणारा आहे. मनोगतात डॉ.जगदीश नाईक मन करारे प्रसन्न याचा संदर्भ देऊन हे पुस्तक कोणत्या विचाराने लिहिले आहे ते कळते. आपल्या आईकडून संत विचारांचे बाळकडू डॉ.नाईक यांच्या उल्लेखाने आपल्या कुटुंबाची प्रेरणा जीवनात




मोलाची असते हे कळते! प्रस्तावनेत डॉ.मोहन आगाशे सरांनी ग्रंथ वाचकाना खुला करतांना, समाजात वाचन वावरतांना कोणते भान ठेवावे याची शिकवण तुकोबांनी आपल्या अभंगाद्वारे लिहून डॉ.अल्बर्ट एलिस यांच्या अगोदर तुकोबांनी समाज चिकित्सेसाठी आरइबीटी सिद्धांत उपयोगात आणल्याचे लिहिले आहे. त्यानंतर डॉ.बाहेकरांनी तुकोबांविषयी लिहितांना, व्यक्तीच्या विकासाशिवाय समाज, समाजाच्या विवेकाशिवाय देश आणि देशाच्या सकारत्मकतेशिवाय मानवतेची उन्नती शक्य नाही असे लिहून वाचकांना अंतर्मुख केले आहे. प्रस्तुत ग्रंथाचे लेखक डॉ.जगदीश नाईक यांची पाठराखण करतांना, डॉ.जगदीश नाईक यांनी ज्या अंगांनी या अभंगांचे विश्लेषण केले आहे तो दृष्टीकोन वेगळेपणाचा आहे. मनोवृत्तीच्या बदलाचे अनेक पदर त्यांनी पृथक्करण पद्धतीने मांडले असल्यामुळे सामान्य वाचाकाला सुद्धा तो कुठे अडकला आहे आणि त्याची सुटका कशी होईल याचे आकलन होऊन त्याला वास्तवाचे भान येऊ शकते असे लिहून डॉ.बाहेकर सर आपला आणि डॉ.नाईक सरांचा वाचन व्यासंग अधोरेखित करतात. ।।तुकायन।।चा पहिला भाग हा मोठा मोलाचा आणि प्रस्तुत ग्रंथाचा गाभाच म्हणता येईल. उभा ऐलथडी तेणे घालू नये उडी अभंगाने प्रारंभ झालेले हे पुस्तक माणसाने एखाद्या कार्याची पूर्वतयारी कशी करावी, सॉट विश्लेषण, पुर्वानुभावाची शिदोरी, आळस दूर ठेवणे, सातत्य चिकाटी आदि मुद्दे सांगून माणसाने कोणतेही कार्य अचानक करू नये याचे सोदाहरण सांगितले आहे. त्यानंतर शुके नळीकेशी गोवियेले पाय अभंगातून माणसाने स्वतःचे सॉट विश्लेषण आपली बलस्थाने, कमतरता, संधी आणि धोके समजून घेऊन काम करत रहावे असा मोलाचा संदेश दिला आहे. त्यानंतर उचिताचा काळ साधावया युक्ती बळ, अनुभव आले अंगा ते या जगा देत असे, तुकाम्हणे आळा उदक देता लाभे फळा, असाध्य साध्य करीता सायास कारण अभ्यास तुका म्हणे, तुका म्हणे टाकी घाये देवपण फुटलिया जन कुला पुशी या सारखे लोकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या तुकोबांच्या अभंगातून आपण आपले दैनदिन जीवन, कार्य कसे करावे याचे उत्तम विश्लेषण डॉ.नाईक सरांनी केले आहे.।।तुकायन।।च्या तुकोबांचे भावविश्व भागात भावना, रागावर नियंत्रण, हव्यास, अहंकार, मान-अपमान, आळस, क्षमा, धीर, चित्त समाधान, शांती, मन इत्यादी विषयावे लिहितांना तुकोबांचे अभंग जगप्रसिद्ध मनोविकार शास्त्रज्ञ डॉ.एलिस यांच्या दोनशे वर्षे अगोदर माणसाने या सर्वच नैसर्गिक भावनांवर कसे नियंत्रण ठेवावे याचे विश्लेषण वाचायला मिळते. ।।तुकायन।।चा तिसरा भाग तुकोबांनी उल्लेखिलेल्या सामाजिक आणि त्यावरील उपायाच्या अनुषंगाने आहे. माणसाची उत्पत्ती झाली तेंव्हापासून ते आजतागायत माणसाने निर्माण केलेल्या त्याला संपवत आहेत मात्र त्या समस्या संपायला तयार नाहीत. तुका म्हणे न लागे द्यावा जीव अभंगाचे मूळ मोलाचे आहे. महत्प्रयासाने मिळालेला मानव जन्म आत्महत्या करून जर गमावत असू तर तो किती मोठा मूर्खपणा! माणसाला एक दिवस मरावेच लागणार आहे, तेंव्हा कर्म करून मरावे. दरवर्षी आत्महत्या करणाऱ्या लोकांची संख्या वाढतच आहे; हि मोठी चिंतेची बाब असून तुकोबांचे अभंग वाचल्यानंतर कुणाच्याही मनातून आत्महत्या करण्याचे विचार सहजच गळून पडतील. लोक काय म्हणतील, व्यसनाधीनता, गांधीजींची तीन माकडे, आड विवाद ते कलह, गैरसमज, पूर्वगृह, उपयुक्तता मूल्य, देह संपदा, ठेविले अनंते तैसेची रहावे इत्यादी महत्वपूर्ण मनोवैज्ञानिक विषयाच्या अंगाने तुकोबांच्या ऐसा हा लौकिक कदा राखवेना, पापाची वासना नको दावू डोळा, कानडीने केला मराठी भ्रतार, जेवी नवज्वरे तापले शरीर, जन हे सुखाचे दिल्याघेतल्याचे, तुका म्हणे जागा हिता, सुख पाहता जवापाडे, हेची थोर भक्ती आवडती देवा इत्यादी तुकोब्च्या अभंगाधारे डॉ.नाईक साहेबांनी वर्तमानातील अत्यंत महत्वपूर्ण वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक समस्येचे सटीप विश्लेषण केले आहे.

।।तुकायन।।हा ग्रंथ अनमोल असून धकाधकीच्या जीवनात आज आपल्याला वाचन-लेखन-चिंतन करायला वेळ नसतांना डॉ.जगदीश नाईक सरांचा हा ग्रंथ नित्य दिशादर्शक आहे. ग्रंथाचे चार भाग म्हणजे चार आश्रम आहेत. पहिला भाग तरुणांना, दुसरा संसारीकांना, तिसरा वानप्रस्थांना आणि शेवटचा सर्वांना मार्गदर्शक आहे. अलीकडच्या काळात संत तुकारामांच्या अभंगांचे मनोविश्लेषण करणारा हा दुर्मिळ ग्रंथ असून वाचकांनी तो वाचलाच पाहिजे. यातून आपल्याला आणेल समस्यांचे उत्तर मिळाल्याशिवाय राहणार नाही. फक्त एकाच गोष्ट म्हणजे अनेक ठिकाणी अभंगांचा उल्लेख करतांना लेखक तुकोबांच्या अभंग ओळींना ओवी संबोधतो तेंव्हा थोडे खटकते. एवढा मोठा मनोविकारतज्ञ तुकारामांच्या अभंगांवर एवढं सुंदर पुस्तक लिहितो हे तुमचे आमचे अहोभाग्य!।।तुकायन।।या दुर्मिळ ग्रंथ प्रकाशनाला हार्दिक शुभेच्छा देतो आणि थांबतो! जय तुकोबाराय!

**-प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये**
**कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ**
**जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो.९१५८०६४०६८**





जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय पेठवडज येथे गावातील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या अध्यक्षा सौ सुनिता अशोकराव डावकोरे यांनी सत्कार केला यावेळेस उपस्थित सर्व महिला कर्मचारी(छाया -संतोष जाधव)

# गोरक्षण सेवा संघाच्या आमरण उपोषण शहरातून मुकमोर्चा व्यापाऱ्याचा सहभाग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी वै,गोरक्षण सेवा संघ महाराष्ट्र राज्य परळी वैजनाथ यांच्यावतीने गेल्या पाच दिवसापासून कत्तलखाना बंद करा, गोहत्या बंद करा यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. या उपोषणाला सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. उद्या दि. ८ रोजी परळी शहरात सकल हिंदू समाज एकत्रित होऊन सामुहिकरित्या या उपोषणाला पाठिंबा दिला, आहे. या अनुषंगाने परळी बाजारातील व्यापारीही उस्फूर्तपणाने पाठिंबा देणार असल्याची माहिती व्यापारी महासंघाने दिली आहे. व शहरातून मुकमोर्चा आयोजन करून




सर्व हिंदू समाज एकत्र येत शांततेत दि, ९ रोजी मूक मोर्चा पार पडला, गोरक्षण सेवा संघ महाराष्ट्र राज्य परळी वैजनाथ सकल व हिंदूसमाज परळी वैजनाथ यांच्या वतीने गेल्या पाच दिवसांपासून आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे.गौ हत्या बंद झालीच पाहिजे या प्रमुख मागणीसह अन्य सहा मागण्या करिता परळी नगरपरिषद समोर चालू असलेल्या गोरक्षक यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल हिंदू समाज परळी तालुका यांच्या वतीने दिनांक ८.३.२०२५ रोजी सकाळी ९ वाजता राणी लक्ष्मीबाई टॉवर ते नगरपरिषद कार्यालय येथे जावून उपोषणास सामुहिक पाठिंबा देण्यात आला

या अनुषंगानेच विविध संस्था, संघटना यांनी जाहीर पाठिंबा व्यक्त करत या मूक मोर्चात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे व्यापारी महासंघाच्या वतीनेही या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी व मूक मोर्चात सहभागी होण्यासाठी व्यापार पेठेतील व्यापारी बांधवांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद असुन या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सर्व व्यापारी वर्ग या मूक मोर्चा मध्ये सहभागी होणारा असल्याची माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड व अन्य पदाधिकारी यांनी दिली आहे. तसेच या मूक मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता,

**झाडे लावा झाडे जगवा**

### जागतिक महिला दिनानिमित्त बडूर ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मान

# गावोंगावी किशोरी हितगुज मेळावा आयोजनाची गरज-रफिक शेख

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

जागतिक महिला दिनानिमित्त बिलोली तालुक्यातील मौजे बडूर ग्रामपंचायत वतीने महिला मेळावा व किशोरी हितगुज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी रफिक शेख बोलत होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करून उपस्थित महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात गावातील विविध स्पर्धेत यश व नोकरी मिळवलेल्या मुलामुलींच्या आईंचा सन्मान करण्यात आला. यावेळी समाजबंध निर्मित 'प पाळीचा' या माहिती पुस्तिकेचे विमोचन व वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच चेतना मोहन जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात उपविभागीय पोलीस अधिकारी रफिक शेख यांनी बालविवाह प्रतिबंधासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, महिला सुरक्षितता आणि महिला सक्षमीकरण



या विषयावर विस्तृत असे उपस्थितना मार्गदर्शन केले. तर आरोग्य उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.नम्रता खानापुरे यांनी बालविवाह प्रतिबंध, विधवाना सन्मान मिळावा, मुलीचा जन्मदर वाढावा, किशोरवयीन मुलींनी घ्यावयाची काळजी याविषयावर मार्गदर्शन केले तर गौतम भालेराव आणि कमलाकर जमदडे यांनी ही आपले विचार व्यक्त केले.सामाजिक कार्यकर्ते भीमशाहीर गौतम भालेराव यांचा संविधान जागर पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते बालाजी यलगंदरे, कमलाकर जमदडे, नामदेव कल्याणकर, रमेश सोमवारे, पो.पा हणमंतराव जाधव पाटील, ग्राम पंचायत सदस्य आनंद पा.जाधव, मुख्याध्यापक साहेबराव कवळे, सहशिक्षक राजू पाटील, प्रबुद्ध दुगाने, अजय तोटावार, सहशिक्षिका पुजा मुदलवार यांच्या समवेत अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, ग्राम पंचायत सेवक व किशोरवयीन मुले-मुली, गावातील महिला व पुरुष हे मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन पांडूरंग मामीवार यांनी केले तर आभार गावच्या सरपंच चेतना जाधव यांनी मानले.

# एस.टी.कामगार सेनेच्या अध्यक्षपदी पाटील यांची बिनविरोध निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

बाळासाहेब ठाकरे शिवसेना एसटी कामगार सेनेची बैठक उप जिल्हा प्रमुख महेश पाटील अल्लापुरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या या बैठकीच्या वेळी कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली.

एसटी कामगार सेनेची बैठक एसटी महामंडळ डेपोच्या सभागृहात एसटी कामगार सेनेचे प्रादेशिक सचिव सुधीर पटवारी, विभागीय अध्यक्ष जय कांबळे, विभागीय सचिव पीसी कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होऊन कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली.अध्यक्ष महेश पाटील



अल्लापूरकर, उपाध्यक्ष शंकर दाचावार, उपाध्यक्ष एच.बी. गाणे, सचिव इरवंत सूर्यवंशी, सहसचिव व्यंकट देशटवार, कार्याध्यक्षपदी राहुल झगडे, कोषाध्यक्ष संघटक सचिव एस. एम. मुखेडकर, प्रसिद्ध प्रमुख ज्ञानेश्वर भुरे, एस. आर. घाटे, कायदेशीर सल्लागार एम.पी. धुतराज व तसेच कार्यकारणी सदस्य म्हणून शेख खादर, नितीन पांचाळ, एस. के. राजुरकर, दयानंद लोहकरे, सय्यद राऊत, शेख अश्फाक, सय्यद शालीयुद्दीन सय्यद शहाबुद्दीन आदींची निवड करून सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला यावेळी कामगार सेनेचे सदस्य नोंदणी सुरू करण्याचे ठरविले.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या परळी तालुकाध्यक्षपदी नितीन ढाकणे कार्याध्यक्ष सय्यद सबाहत अली,उपाध्यक्ष अमोल सूर्यवंशी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**परळी । प्रतिनिधी**



मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी डिजिटल मीडिया परिषदेच्या परळी तालुकाध्यक्षपदी नितीन ढाकणे, कार्याध्यक्ष सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष अमोल सूर्यवंशी तर सचिवपदी शेख मुद्दसिर यांची निवड जाहीर केली आहे. परळी तालुक्यातील अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे तालुका समन्वयक धनंजय आरबूने, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक जगदीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी तालुक्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

सध्याच्या युगामध्ये प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण अस महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ६ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची परळी तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यामध्ये तालुकाध्यक्षपदी– नितीन ढाकणे, कार्याध्यक्ष– सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष अमोल सूर्यवंशी, सचिव– शेख मुद्दसिर, संघटकपदी– अभिमन्यू फड, सहसंघटक – मयूर आरबुने, तर कोषाध्यक्ष म्हणून – श्रीमंत खांडेकर यांचा समावेश आहे.बीड तालुक्यात यूटयूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, पोर्टल, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी परळी तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त जनसेवा प्रतिष्ठान, कंधारतर्फे शनिवारी, दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता नवरंगपुरा ता.कंधार येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मुन्ना खाडे, स्वरुप खाडे, ज्ञानेश्वर उगले, विष्णू उगले, सचिन कांबळे आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने रंगले श्रीराम इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन

### विद्यार्थ्यांचे धमाल नृत्य; मुलगी वाचवा, मोबाईलचे दुष्परिणामावर नाटकातून जनजागृती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील लुखामसला येथील श्रीराम इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने चांगलेच रंगले. विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करुन उपस्थित मान्यवर तसेच ग्रामस्थांची मने जिंकली. यावेळी मुलगी वाचवा, मोबाईलचे दुष्परिणामावर विद्यार्थ्यांनी नाटक सादरीकरण करुन जनजागृती देखील केली.

श्री जय शिवशंकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रीराम इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, दैठणचे सरपंच प्रतापसिंह पंडित, लुखामसला गावचे सरपंच रावसाहेब काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विलास अण्णा पंडित, रमेशराव पंडित, बाळासाहेब पंडित, केंद्रप्रमुख एकनाथ नरके सर, व्हाईस ऑफ मिडीयाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष भागवत जाधव, गेवराई तालुका दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे, बीड पोलिस संतोष तांबे, श्याम चाळक सर, प्रशांत नरके, प्रशांत मस्के, राजेंद्र वाकडे सर, संतोष थोरात सर, दिलीपराव लांडगे आदींसह आलेल्या सर्व पाहुण्यांचे संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.दरम्यान कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुणवंत विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यानंतर श्री गजानना या गिताने स्नेहसंमेलनाची सुरुवात करुन यानंतर झुबी डुबी, आस्ते कदम, माऊली माऊली, बद्री की दुल्हनिया, पिचली माझी बांगडी, कोळीगीत, महाभारत, मदन मंजिरी, मेरे वाला डांस यासह मराठी लावणी, हिंदी गीते, मुलगी वाचवा व मोबाईलचे दुष्परिणाम यावर नाटीका, देशभक्ती गीते, ऐतिहासिक गीते अशी विविध गीतांवर बहारदार नृत्य सादर करत मुलांनी स्नेहसंमेलन कार्यक्रमात धमाल उडवून दिली. या कार्यक्रमाला लुखामसला, दैठण येथील ग्रामस्थ, पालक, महिला, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे संचालक गणेश तांबे, मुख्याध्यापिका सोनाली तांबे, सहशिक्षिका कु.कल्याणी सावंत, अंजली वावरे, नयन वावरे मिस, वैष्णवी वावरे, कोमल बर्गे, अश्विनी कांबळे, आईशा शेख, साक्षी पंडित यासह बळीराम खोटे, कृष्णा जोशी, कुलदीप पंडित, उमेश पंडित, निळकंठ पंडित, कृष्णा पंडित, गजानन काळे, अंगत पंडित आदींनी परिश्रम घेतले.

# कोरपना–नारंडा–भोयगाव चंद्रपूर बस सेवा सुरू करा

### भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । प्रदीप मडावी**



कोरपना –नारंडा –भोयगाव –चंद्रपूर बससेवा सुरू करण्यासंदर्भात राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे राजुरा आगार प्रमुख यांना निवेदन दिले.

सदर बससेवा सुरू झाल्यास कोरपना तालुक्यातील कोडशी बु,कोडशी खुर्द,गांधीनगर,हेटी,शेरज बू, शेरज खुर्द,माथा, लोणी,पिपरी,नारंडा,वनोजा, कढोली खुर्द,अंतरगाव, सांगोडा,हिरापूर, विरुर,गाडेगाव, बोरगाव, इरई,भारोसा,भोयेगाव इत्यादी गावातील नागरिकांना फायदा होईल.

कोरपना – नारंडा–भोयगाव–चंद्रपूर बससेवा सुरू झाल्यास कोरपना तालुक्यातील नागरिकांना चंद्रपूरला जाण्यासाठी सोपा व सोयीचा होईल. सदर मार्गावर कोरोना पासून एकही बस सेवा सुरु नव्हती ,त्यामुळे जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना राजुरा मार्गे फेरा घेऊन जावे लागत आहे.त्यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाया जात होता ,सदर बस सेवा सुरु व्हावी अशी परिसरातील नागरिकांची गेल्या अनेक पासून मागणी होत होती. सदर मागणीची दखल घेत चंद्रपूर वरून नारंडा मार्गे कोरपनासाठी सकाळी ८.३० वाजता व सायंकाळी ५.०० वाजता व कोरपनावरून नारंडा मार्गे सकाळी १०.३० वाजता बस सेवा सुरु करण्यासंदर्भात भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे आगर प्रमुख यांना निवेदन देऊन सदर बस सेवा सुरू करण्यासंदर्भात निवेदन देऊन मागणी केली. आपण लवकरात लवकर सदर बससेवा सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही करू अशी आश्वासन राजुरा आगार प्रमुख यांचे मार्फत देण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय महिला दिन व मातांचा प्रेरणादायी सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । नबाजी कुडकेकर**



जि. प.कें. प्रा. शाळा केसराळी शाळेत आंतरराष्ट्रीय महिला दिन व मातांचा प्रेरणादायी सन्मान सोहळा* मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या विद्यार्थि परिषदेने केले होते. सकाळी विद्यार्थिनींनी शाळेच्या परिसरात फुल व रांगोळीची आरास केली.

त्यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या सरपंच श्रीमती माधुरीताई मनधरने व राजू पाटील मनधरणे तसेच अंगणवाडी ताई यांचे स्वागत करण्यात आले. त्यावेळी गावचे सरपंच यांनी विद्यार्थिनींना संबोधित करताना महिलांच्या सबलीकरणासाठी योग्य ते मार्गदर्शन केले त्यावेळी माता पालकांनीही महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.

शेवटी,शाळेच्या मुख्याध्यापक वाघमारे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षिका व कर्मचारी महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देवून कार्यक्रमाचा समारोप केला. महिला सक्षमीकरणाच्या महत्त्वाचा पुनरुच्चार केला आणि विद्यार्थिनींना भविष्यात आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचे आवाहन केले.

शेवटी सर्व माता पालकांना शैक्षणिक साहित्यरूपी भेटवस्तू देण्यात आली.

# जागतिक महिला दिन श्री गुरू गोविंदसिंगजी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**




जागतिक महिला दिना निमित्त श्री गुरुगोविंद सिंग जिल्हा सामान्य रुग्णालय नांदेड येथे मा.डॉ. निळकंठ भोसीकर, जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड यांच्या प्रमुख उपस्थितीत ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आज रोजी अवयव दान जनजागृती व जागतिक श्रवण दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अवयव दान कसे केले जाते याबद्दलची पूर्ण प्रक्रिया डॉ.वैष्णवी कुलकर्णी,बधीरीकरण विभाग प्रमुख डॉ.शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी यांनी मार्गदर्शन केले. तसेच जागतिक श्रवण दिन बद्दल श्रवणदोष का येते व काळजी काय घ्यायची याबद्दलची मार्गदर्शन डॉ.अश्विन लव्हेकर कान,नाक व घसा तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय पेरके ,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.हनुमंत पाटील, डॉ. एच.के. साखरे,डॉ.पुष्पा गायकवाड तसेच मेट्रन श्रीमती राठोड, सर्व विभागाच्या इन्चार्ज सिस्टर, परिचर्या प्रशिक्षण केंद्र सामान्य रुग्णालय नांदेड येथील प्राचार्य श्रीमती बोथीकर व सर्व शिक्षक व प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व अधिकारी कर्मचारी व महिला सफाई कर्मचारी हे सर्व उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शितल उदगीरकर व ज्योती पिंपळे यांनी केले. महिला दिनानिमित्त मा.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांनी सर्व उपस्थित महिलांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व महिलांबद्दल चे आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर श्रीमती हळदेकर व श्रीमती विद्या बापते यांनी देखील महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी व रुग्णालयात आलेल्या सर्व रुग्णांचे व नातेवाईकांचे आभार मानून कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.

# रस्त्यावर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला २४ तासाच्या आत अटक;औसा पोलिसाची कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**



याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक ४ मार्च २०२५ च्या मध्यरात्री एका अज्ञात आरोपीकडून औसा शहरातील एका दुकानासमोर झोपलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून त्याला जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. सदर घटनेमध्ये सदरचा भिकारी जळून गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर औसा व त्यानंतर लातूर येथील रुग्णालयात उपचार चालू असताना त्याने दिलेल्या फिर्यादीवरून ०५ मार्च रोजी पोलीस ठाणे औसा येथे दिनांक गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, औसा कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे यांचे पथकाने गुन्ह्याचा अतिशय बारकाईने तपास करून गोपनीय माहिती मिळवून रस्त्यावर दुकानासमोर झोपलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळणार्या आरोपीला निष्पन्न केले असून त्याचे नाव १)योगेश सिद्राम बुट्टे, वय ३५ वर्ष, राहणार अन्नपूर्णा नगर, औसा. असे असून त्यास दिनांक ७ मार्च २०२५ रोजी त्याचे राहते ठिकाणाहून अटक करण्यात आली आहे. भिकाऱ्याने आरोपीला शिवी दिल्याचा राग मनामध्ये धरून रात्री रोडवर झोपलेल्या भिकाऱ्याला पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल असल्याचे कबूल केले आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात औसा पोलिसांनी अतिशय कुशलतेने गुन्ह्याच्या तपास करून अज्ञात आरोपीला २४ तासाच्या आत निष्पन्न करून गुन्ह्यात अटक केली आहे.सदरची कामगिरी वरिष्ठांचे व पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांच्या मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक महावीर जाधव, सहाय्यक फौजदार कांबळे, पोलीस अंमलदार गुट्टे, रतन शेख, समीर शेख, मुबाज सय्यद, बालाजी चव्हाण, पडीले,गोमारे यांनी केली आहे.

# जि.प.कें.प्रा.शाळा शिराढोण येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासनातर्फे वेगवेगळे समाजाभिमूख, सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात. शिक्षण प्रक्रियेत समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे पत्रकातील ( जा.क्र. विशिउसं/ला/कार्या–०८/एस आर आर/२०२५/१७६६ दिनांक–०५ मार्च २०२५) विषयांन्वये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाचे उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी माता–पालक गट , शिक्षक पालक संघ, शालेय व्यवस्थापन समिती व मातांच्या सहभागाने सलग तीन वर्षांपासून पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरीत्या राबवत आहोत. सदर कार्यक्रमामुळे शासन, शाळा, ग्रामपंचायत, माता गट, लीडर माता, स्वयंसेवक व ग्रामस्थ या मुख्य घटकांच्या समन्वयाने व पुढाकाराने गावात लक्षणीय शैक्षणिक वातावरण तयार होणार आहे.

सदर कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि जनभागीदारी अंतर्गत शाळेत / वाडी–वस्ती निहाय असलेल्या निपुण माता गटाच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून आपल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा शिराढोण ता.कंधार येथे दिनांक ८ मार्च २०२५ रोजी महिला दिनाचे औचित्य साधून शाळा स्तरावर माता गटांना एकत्र करून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करत ग्रामस्थांसमोर माता पालकांचा सन्मान



करण्यात आला.सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.तारा मठपती मॅडम या होत्या, तर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, प्रभाकर कपाळे, शिवहार भुरे (उपाध्यक्ष शा.व्य.स), नबीन शेख, सूर्यकांत इंगळे ,राजू कचरे बबनराव पांचाळ, श्रीमती मंजुषा डुमणे यांची प्रमुख उपस्थिती होती.सुरूवातीला राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर स्वागतगीतांनी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. मान्यवर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर गावातील उपस्थित असलेल्या माता पालकांचा जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पुष्पहार व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. त्यानंतर महिलांनी आपल्या पाल्यांच्या विषयी शैक्षणिक चर्चा करण्यात आली. मान्यवरांच्या मनोगतानंतर शालेय क्रीडा स्पर्धेत पहिला दुसरा आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन बाबाराव विश्वकर्मा यांनी केले तर, शेवटी आभार विकास राठोड यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक मधुकर कारामुंगे, विश्वदीपक बिज्ञेवार, सौ.अनिता पचलिंग, सौ. राखी लव्हेकर व सविता बिजमवार, शालेय पोषण आहार कर्मचारी शिवाजी पत्तेवार, मोहनराव कपाळे. साईनाथ पांडागळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## होळीच्या तोंडावर गोंडपिपरी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

# दारूसह १६ लाखाचा मुद्देमाल जप्त; दोन आरोपींना अटक




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गोंडपिपरी । आशिष आ. निमगडे**

गडचिरोली जिल्ह्यात पूर्णतः दारूबंदी असल्याने चंद्रपूर जिल्ह्यातून गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात देशी विदेशी दारूची तस्करी केली जात असल्याचे अधून मधून निदर्शनास येत आहे.पोलीस विभाग देखील दारू तस्करांच्या मुसक्या आवडण्यास सज्ज असल्याचे कारवायायंती दिसून येत आहे.

दि.(७) शुक्रवारी गुप्त माहितीच्या आधारावर ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांनी पीएसआय मंगेश कराडे,अतुल तोडासे,प्रशांत नेताम,तिरुपती गोडसेलवार,रतनसिंग चव्हाण, रियाज शेख या पोलीस ताफ्यासह छत्रपती शिवाजी चौकात नाकाबंदी करून दणत चक३३–उ ४२४२ चार चाकी वाहन सायंकाळीं सहा वाजता दरम्यान पकडले.गाडी तपासणी केली असता देशी दारूचा अवैध्य दारुसाठा आढळला.राकेश शिव मशीद मशीन वय (२९)रा.गौरीपूर ता.चामोर्शी जिल्हा गडचिरोली,चंद्र्या गडमवार चामोर्शी या दोन आरोपींना अटक करून १ लाख ७५ हजारांच्या दारूसह एकूण १६ लाख ७५ हजार रुपयांचा दारुसाठा व मुद्देमाल जप्त केला.

### त्यांचे लायसन रद्द करावे...

**प्रशासन मी मारल्यासारखे करतो तू रडण्यासारखे कर या उक्तीप्रमाणे कारवाया करतांना दिसते.भरपूर पळवाटा आहेत कायद्याचा धाक नसल्याने तस्करी वाढली.ज्या दुकानातील अवैद्य दारू तस्करी होते त्या दुकानाचे लायसन रद्द केल्यास अवेद्य दारू तस्करीवर आळा बसेल –**
**सुरज माडूरवार**
**तालुका प्रमुख शिवसेना गोंडपिपरी**

**गोंडपिपरी तालुका तेलंगणा राज्याच्या सीमेवर व गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर असल्याने अवैद्य दारू तस्करी, गांजा, सुगंधित तंबाखू तस्करी मोठया प्रमानात होते.पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर रुजू झाल्यापासूनच ठाणेदार रमेश हत्तीगोटे अवैद्य व्यावसायिकांसाठी कर्दनकाळ ठरत आहे.होळी सण जवळ असल्याने पोलीस विभाग अलर्ट मोडवर आहेत.त्यांनी नुकतच ३ मार्चला १३ लाख १६ हजार ६०० रुपयांचा अवैध दारू सह मुद्देमाल जप्त करत एका आरोपीला ताब्यात घेऊन मोठी कारवाई केली होती.पोलिसांनी आतापर्यंत अवैध्य दारूच्या अनेक कारवाई केल्या. मात्र दारू कोणत्या दुकानातील आहे पुरवठा करणाऱ्यांवर कारवाई होणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

## महाबोधी महाविहार (बोधगया बिहार राज्य) मुक्ती आंदोलन संदर्भात अंबाजोगाई येथे १८ मार्च २०२५ रोजी भव्य मोर्चाचे बौद्ध समाजाकडून आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

अंबाजोगाई बिहार राज्यातील महाबोधी महाविहार गेल्या कित्येक वर्षापासून बौद्धांच्या ताब्यात दिले गेले नाही यासंदर्भात अनेक आंदोलने झाली परंतू सरकारने त्याची दखल घेतली नाही. परंतु गेली १८ दिवसांपासून बौद्ध भिक्खू बोधगया मध्ये आंदोलनास बसलेले असून या आंदोलनास समर्थन म्हणून अंबाजोगाईतील बौद्ध समाज म्हणून भारतीय बौद्ध महासभा यांच्या पुढाकाराने भव्य मोर्चा आयोजित केलेला आहे. या मोर्चातील प्रमूख मागणी महाबोधी बौध्द विहार मंदीर कायदा १९४९ रद्द करण्यात यावा. महाबोधी बौध्द विहाराचे सर्व व्यवस्थापन बौद्ध च्या हाती देण्यात यावे.

महाबोधी बौध्द विहारातील ब्राह्मणाचा हस्तक्षेप बंद करण्यात यावा. अश्या आहेत.

हा मोर्चा १८ मार्च रोजी सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई या मार्गाने मार्गस्थ होणार आहे तरी या मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष प्रा. बी.बी.धनवे यांनी आवाहन केले आहे, या अस्तित्वाच्या सन्मानाच्या लढ्यात सामील होत आंदोलनाला समर्थन देणे हे बौद्धांच प्रथम कर्तव्य म्हणत हजारो बौद्ध यात ताकदीने सहभागी होणे होणार असल्याची माहिती आहे. यासंदर्भात दिनांक ०८ मार्च रोजी संपूर्ण बौद्ध समाजातील प्रतिनिधीनी एकत्र आज उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे यासंदर्भात निवेदन सादर केले असून या निवेदनावर ड. बाबासाहेब बी.धन्वे , जगन सरवदे, डी एन घोबाळे, गोविंद मस्के,मारोती सरवदे, व्यंकट वेडे, महादेव आदमाने , रामराजे सरवदे, नामदेव आचार्य , नितिन सरवदे , भावनाताई कांबळे , सुधाताई जोगदंड, शोभाताई जाधव, ड दिलीप गोरे, ड एस के पठाण, ड. तुपसागर, शोभाताई जोगदंड , संजीवनी धनवे, माया बनसोडे शोभा ओव्हाळ, प्रा.राहुल सुरवसे , गौतम सरवदे, रखमाजी जोगदंड, रमाकांत व्हावळे, रामजी कासारे, अर्जुन वाघमारे , जीवन सोनकांबळे , विजय कांबळे, सतिश मस्के, कालिदास सुरवसे, महादेव भालेराव, विजय मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## महिला दिनानिमित्त एसबीआय जनरल इन्शुरन्स तर्फे महिलांना रोपवाटप व पीक विमा योजनेबाबत मार्गदर्शन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

अहमदपूर तालुक्यातील सुमठाणा येथे जागतिक महिला दिनानिमित्त एसबीआय जनरल इन्शुरन्सच्या वतीने महिलांना रोपवाटप करण्यात आले. यावेळी महिलांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थित एसबीआय जनरल इन्शुरन्सचे प्रतिनिधी उज्वल राऊत, बालाजी हाके, समीर इनामदार, तहजीब अहमद आणि अतुल पवार यांनी महिला शेतकऱ्यांना पीक विम्याच्या महत्त्वपूर्ण बाबी समजावून सांगितल्या. त्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना कोण घेऊ शकतो, विम्याची रक्कम किती असेल, शेतकऱ्यांना किती प्रीमियम भरावा लागेल, आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी विमा प्रक्रियेसंबंधी महत्त्वपूर्ण मुद्दे स्पष्ट केले.याशिवाय, कर्जदार शेतकरी विमा घेतलेल्या पिकात बदल करू शकतात का, त्यासाठीची अंतिम मुदत कोणती आहे, आणि स्थानिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीच्या घटनांची नोंद कशी करावी, यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी सरपंच जिजाबाई ज्ञानोबा पोले, पत्रकार विष्णू पोले, पत्रकार नंदराज पोले, मुख्याध्यापक चट सर, गंगासागर शिंदे, गंगाराम पोले, रुक्मिणीबाई पोले, द्वारका मुसळे, गोविंद मुसळे, वंदना पोले, यांच्यासह गावातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना पीक विम्याचे महत्त्व पटवून देत त्यांच्या सशक्तीकरणासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पेठ बीड सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती गेल्या पंधरा वर्षांपासून पेठ बीड भागात विशेष उत्साहाने साजरी केली जाते.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली, या जयंती उत्सवाचे संस्थापक अध्यक्ष अक्षय कोकाटे यांच्या संकल्पनेतून यावर्षीची कार्यकारणी घोषित करण्यात



आली आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध आकर्षक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांमध्ये प्रबोधन व्याख्यान, सांस्कृतिक संगीत रजनी, शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, तसेच भव्य मिरवणूक यांचा समावेश असणार आहे.या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी नवीन उत्सव कार्यकारणीची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये
*अध्यक्षपदी विशाल चांदणे,
**उपाध्यक्ष पदी राहुल कोकाटे,
**कोषाध्यक्ष कपिल ढाकणे,
**सचिव तुषार ईनकर* यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इतर सदस्यांमध्ये योगेश गायकवाड, आकाश कोरडे, सोनु शिंदे, बबलू वाघमारे, सागर धन्वे, शुभम कोकाटे, तुषार मौरे, आणि अभिजित कोकाटे यांचा समावेश आहे.या सन्माननीय कार्यकारणीच्या निवडीनंतर, जयंती उत्सवाचे आयोजन करण्यासाठी अधिराज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जाईल, जेणेकरून महात्मा फुले यांचे विचार आणि कार्य जनसंपर्कात आणता येईल.

## महिला दिनानिमित्त वृत्तपत्र विक्रेत्या वंदना लोणे यांचा सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनिल शिंदे**

दि.८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सिडको परिसरातील कार्यरत महिला विक्रेत्या वंदना लोणे यांच्या सिडको वृत्तपत्र विक्रेते संघटनेच्या वतीने सिडको टिन शेड येथे ८ मार्च रोजी सन्मान करण्यात आला.



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सिडको वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने सिडको परिसरातील एकमेव महिला विक्रेत्या वंदना लोणे असुन दैनंदिन वर्षातील बारा महिनेही सदैव पायी चालत जवळपास चारशे ग्राहकांना सकाळी नियमित सहा ते आठ या वेळात पेपर टाकणाऱ्या लोणे बाई या एकमेव जिल्हा यातील पेपर विक्रेत्या आहेत. ८ मार्च रोजी सिडको परिसरातील वृत्तपत्र विक्रेते संघटनेच्या वतीने सिडको टिन शेड येथे नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकूर, लोकमत वितरणचे सुधाकर काकडे, गणेश डोळस, संघटनेचे अध्यक्ष सतिश कदम बालाजी सुताडे,जेष्ठ वितरक शेख सयोध्दीन, दौलतराव कदम, राजु चव्हाण,अमोल नांदेडकर,राम धावडे, यांच्या उपस्थितीत पुष्पगुच्छ पुष्पहार शाल श्रीफळ देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904